एस. डी. आर. २ ... जळलेले दरवाजे व खिडक्यांचे नूतनीकरण

एस. डी. आर. ३ ... गळती रोखण्यासाठी पाणीपुरवठ्यांचे नूतनीकरण व जलनिस्सारणाचे पाईप यांची फेरजुळणी (रिप्लंबिंग).

7. (b) MAINTENANCE AND REPAIRS OF BUILDINGS

Generally, the following items are required to be carried through the maintenance grants :--

(I) Current Repairs (CR) : Current repairs are those which are carried out as a matter of routine, either annually or periodically, The petty repairs items are normally covered in such type of repairs. Items are as under :--

CR-1 Repairs to fixtures and fastenings of doors and windows.

CR-2 Repairs to frames and shutters of doors and windows.

CR-3 Repairs to Sanitary and Water Supply fit tings.

CR-4 Colour washing, distempering and patch painting of walls and doors and windows.

CR-5 Repairs to floors.

CR-6 Repairs to plaster, pointing.

CR-7 Repairs to roof such as turning tiles, replace ment of tiles, attending to leakages, water proofing, course etc.

CR-8 Monsoon protection such as Bamboo mat ting, etc.

CR-9 Maintenance of Electrical fittings and fixtures.

CR-10 Miscellaneous items of similar nature.

(II) Special Repairs (SLR) : These are repairs other than repairs which are required at long intervals and become necessary from time to time. Such repairs are as under :--

SLR-1 Partial Reroofing.

SLR-2 Distempering and Colouring.

SLR-3 Replacement of water supply and sanitary pipes.

SLR-4 Periodical Oil Painting.

SLR-5 Replacement of Electrical Wiring.

SLR-6 Plaster to walls.

SLR-7 Miscellaneous items of special repairs in case of any damage.

(III) Specified Repairs (SDR) : This category of repairs includes major repairs with a view to structurally strengthen the building, prolong its life, improve the hygenic conditions and improve safety of the building.

The items of repairs are as under :--

SDR-1 Renewal of old dilapidated roof with M. Tiles, A. C. Sheet etc.

SDR-2 Renewal of decayed doors and win dows.

SDR-3 Replumbing to reduce leakages from water pipes and down take pipes.

एस. डी. आर. ४ ... गनायटिंग व गंजरोधक.

एस. डी. आर. ५ ... ज्याची आयुर्मर्यादा संपली आहे अशा विद्युत वायरींगचे नूतनीकरण (जेथे गनायटींग करण्यात आले तेथे विद्युत वायरींगच्या आवश्यक नूतनीकरणाचा विचार व्हावा.)

एस. डी. आर. ५अ ... ज्याची मितव्ययी आयुर्मर्यादा संपली आहे अशा मोटार, पम्प व हांइस्ट बदलणे.

एस. डी. आर. ६ ... भिंतीच्या बाह्य पृष्ठभाग ओला असल्यास व गिलावा हे गळतीचे कारण असल्यास, नव्याने गिलावा करण्याचे काम हाती घेता येईल.

एस. डी. आर. ७ ... गळती व ओलसरपणा थांबविण्यासाठी जलरोधक (वॉटर प्रुफिंग) प्रक्रिया करणे.

एस. डी. आर. ८ ... इमारतीचा पाया काळ्या मातीत असल्यास जोत्याचे संरक्षक काम.

एस. डी. आर. ९ ... आवश्यक असेल तेथे जलनिस्सारणाचे कामात सुधारणा ज्यात जोत्याच्या सभोवतालच्या गटारांच देखील समावेश असेल.

एस. डी. आर. १० ... अति जुने झालेले व तडा गेलेले विटांचे खांब, भिंती याची पुनर्बांधणी करणे.

एस. डी. आर. ११ ... पावसाळी छप्पर (वेदर शेड) बदलणे.

एस. डी. आर. १२ ... नुकसान झालेल्या लादीचे नूतनीकरण.

इमारतींच्या परिरक्षणाची माहिती देताना खाली दाखविलेल्या इमारतींचे विविध प्रकार पाडून त्याप्रमाणे दिली आहे :--

(१) प्रशासकीय इमारती.

(२) निवासी इमारती.

(३) रुग्णालयाच्या इमारती.

इमारतींच्या परिरक्षणाची प्रमाणके शासनाने निर्गमित केलेल्या परिपत्रक क्रमांक बीडीजी १०८८/सीआर १४०/इमा.--२ दि. १९-३-१९९१ चे प्रपत्र ३ मध्ये देण्यात आलेली आहेत, त्यामध्ये शासन निर्णय सा.बां. नि. क्र. बीडीजी-२००५/अ.क्र. ५३/इमा-१/दि. २५ नोव्हेंबर, २००५ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे.

SDR-4 Guniting and corrosion protection.

SDR-5 Renewal of electric wiring which has outlived its life, (Wherever guniting is done, necessary renewal of electrical wiring should be considered).

SDR-5A Replacement of motors, pumps, hoists, etc. which have outlived economical life.

SDR-6 Where external walls are wet due to leakages, etc. the replastering work can be undertaken if than is the cause of leakage.

SDR-7 Water proofing to stop leakage and dampness.

SDR-8 Plinth protection work, if the building is situated on B. C. Soil strata.

SDR-9 Drainage improvements including pro vision of gutters around the plinth, were required.

SDR-10 Reconstruction of old cracked/de cayed Brick Pillars/Walls.

SDR-11 Work of replacement of weather sheds.

SDR-12 Renewal of Damaged flooring.

The information regarding maintenance of buildings have been shown separately according to category of buildings such as :--

1) Administrative
2) Residential and
3) Hospital

The norms for maintenance of buildings are indicated in the Statement III of Government Circular No. BDG-1088/CR-140/Bldg. 2, dated 19-3-1991, Statement-III. Which are amended by Govt. resolution No. BDG 2005/CR 53/Bldg. 2 dt. 25-11-2005.

८. दक्षता व गुण नियंत्रण संघटना

सार्वजनिक बांधकाम विभागात मुख्य अभियंता व सहसचिव तसेच क्षेत्रीय मुख्य अभियंते यांच्या नियंत्रणाखाली क्षेत्रीय कामाबाबत दक्षता घेण्यासाठी आणि गुण नियंत्रण राखण्यासाठी दक्षता व गुण नियंत्रण संघटना आहे. ह्या संघटनेत प्रत्येक प्रादेशिक विभागीय (मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर) येथे एक याप्रमाणे एकूण सहा दक्षता व गुण नियंत्रण मंडळे असून प्रत्येक मंडळ अधीक्षक अभियंता यांच्या नियंत्रणाखाली काम करते.

कर्तव्ये :

ह्या दक्षता व गुण नियंत्रण मंडळाची कर्तव्ये संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे आहेत :

(अ) सर्वसाधारण :

१) कनिष्ठ प्रतीच्या कामाबद्दल व इतर प्रकारच्या शासनाकडे आलेल्या व मुख्य अभियंत्याकडे आलेल्या व त्यांनी दक्षता पथकाकडे सोपविलेल्या तक्रारींची चौकशी करणे.

२) कामांची अचानक तपासणी निरीक्षण करणे, त्यामध्ये हजेरीपत्रक तपासणे, मोजमाप तपासणे, नमुना तपासणी (टेस्ट रिझल्टस्) इ. या अंतर्भाव असेल या मंडळांतर्गत असलेल्या प्रयोगशाळेमधून बांधकामावर वापरण्यात येत असलेल्या साहित्याच्या चाचण्याही घेण्यात येतात.

३) जादा बाबी, दरसूची, ठेकेदारांना अंशत: (पार्टली) कमी केलेले दर मंजूर करणे व त्यांच्यामधून वसुली करणे, लहान कामे देणे व खात्याकडून करण्यात येणारी कामे, एजन्सी नक्की करणे, काम चालू असताना त्यात बदल करणे व दक्षता घेणे, अशा प्रकरणाची चाचणी, तपासणी करणे, ज्यामुळे या गोष्टी सध्याचे नियम व पद्धती यांस अनुलक्षूनच केल्या आहेत याबाबत खातरजमा करणे.

४) भांडार पडताळणी करणे, भांडार खरेदी व जादा भांडाराची, ज्यामध्ये सामानाचाही अंतर्भाव असेल, विल्हेवाट लावणे याबाबतची पडताळणी करणे.

५) शासकीय वाहनांचा योग्य वापर, नियम आणि पद्धती यांची पूर्तता यासारख्या संकीर्ण गोष्टींची तपासणी करणे.

६) कामांची पाहणी करून त्रुटी संबंधितांच्या निदर्शनास आणून देणे.

(ब) तांत्रिक लेखापरीक्षा कर्तव्ये :

१) कंत्राट कागदपत्राचा अभ्यास करणे व त्यातील दोष, त्रुटी दाखवून देणे.

२) चालू बिले, अंतिम बिलाची नियतकालीक तपासणी करणे.

३) संमत झालेल्या अंदाज व नकाशाप्रमाणे कार्याची अंमलबजावणी होते किंवा नाही याची तपासणी करणे.

(क) प्रशिक्षणात्मक कर्तव्ये :

१) कामाच्या विविध अवस्थेमध्ये गुण नियंत्रणाबद्दल सर्व दृष्टिकोनातील तांत्रिकी माहिती पुरविणे.

२) माती व इतर सामानाच्या तपासणीबाबत पूर्ण तांत्रिक माहिती सर्व मार्ग प्रकल्प विभागांना पुरविणे.

8. VIGILANCE AND QUALITY CONTROL ORGANIZATION

There is a Vigilance and Quality Control Organization in Public Works Department Under the control of Chief Engineer and Joint Secretary to exercise vigilance on field activity and to tone up quality and control in field work Under this organization. There are in all 6 Vigilance and Quality Control Circles one each at Regional Office level (e. at New Mumbai, Pune, Nasik, Aurangabad, Amravati and Nagpur) and each circle works under the control of Superintending Engineer.

The duties and functions of the Vigilance and Quality Controls Circles can be briefly described as under:

(A) General :

1. Investigation into complaints received by Government and serious complaints received by Chief Engi- neers entrusted to Vigilance and Quality Control Organization.

2. To carry out surprise checks/inspections of works including checking of musters, measurements, test results *etc*.

3. Monitoring and Vigilance over extra items, rate lists, partly reduced rates, recoveries from contractors, mode of fixing of agencies, changes made during execution etc., in order to ascertain bonafides and regularity thereof.

4. To carry out stores verifications and checking of purchases of stores and disposal of surplus stores including dismantled materials.

5. To investigate miscellaneous matters, such as proper and bonafide use of Government vehicles, compliance of rules and procedures etc.

6. To inspect works and bring to the notice of the concerned, the drawback.

(B) Technical Audit Duties :

1. Study of contract documents and pointing out the defects, omissions, anomalies etc.
2. Periodical Scrutiny of running bills, final bills.
3. Verification as to whether the work is being executed according to the approved ones.

(C) Duties regarding Training :

1. Furnishing technical know how pertaining to all aspects about quality control at all stages of works.
2. Furnishing technical know-how to the Road Project Divisions in regard to the testing of soils and other materials.

३) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गात सरळ समाविष्ट होण्यासाठी अर्हता प्राप्त नसलेल्या व खात्यात कार्यरत असलेल्या मार्ग लिपिक, मिस्त्री, कनिष्ठ अभियंता इ. ना प्रशिक्षित करण्यासाठी पाच महिन्यांच्या कालावधीचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्याचा उपक्रम दक्षता व गुणनियंत्रण संघटनेमार्फत राबविला जात आहे.

दक्षता शाखेचे काम बळकट करण्यासाठी दक्षता व गुण नियंत्रण मंडळामधील एक कार्यकारी अभियंता व काही इतर कर्मचारी वर्ग वेगळा काढून प्रत्येक मंडळात दक्षता शाखा स्वतंत्रपणे कार्यरत आहे.

(ड) इतर कर्तव्ये :

१) सा. बां. संहितेमधील विविध परिच्छेदाबाबत सुधारणा सुचविणे.

२) स्पेसिफिकेशनबाबत सुधारणा करणे तसेच नवीन नवीन बाबींचे स्पेसिफिकेशन तयार करणे.

३) कार्याचा दर्जा सुधारण्यासाठी विविध स्तरावर प्रशिक्षण कार्यशाळा राबविणे.

3. Various training courses for the field staff and a training programme of 5 months duration, is conducted by the Vigilance and Quality Control Organization for Road Clerks and Mistries working in the department but who are not qualified for direct requirement in the cadre of Civil Engineering Assistant.

The strengthen Vigilance Function separate Vigilance Cell under each Vigilance Cell under each Vigilance and Quality Control Circle has been created consisting of the Executive Engineer and other staff created from the

D) Other Duties :

1. To suggest correction in various paragraphs in P. W. D. Manual.
2. To make correction regarding specification as well as to make specification regarding new items.
3. To organize training work-shop at various level for the improvement in the quality of work

९ शासकीय इमारतीमधील विद्युत संच मांडणी

१. महाराष्ट्र राज्यातील शासकीय इमारतीमधील विद्युत संच मांडणीच्या कामाचे व संलग्न आस्थापनेचे कार्य पार पाडण्यासाठी राज्यात पाच प्रादेशिक विद्युत मंडळ कार्यरत असून ते संबंधीत स्थापत्य शाखेच्या मुख्य अभियंता यांच्या नियंत्रणाखाली काम करतात. सदरील नियंत्रण प्रकरण परत्वे खर्चाच्या प्रमाणकानुसार खर्चाच्या प्रमाणकाच्या मर्यादेनुसार पुढील अधिकाराप्रमाणे केले जाते.

१. प्रशासकीय/सुधारित प्रशासकीय मान्यता.

२. परिपूर्ती अहवालाच्या आधारावर अधिक खर्चास मान्यता.

३. निविदा स्वीकृती

४. लेख्यांबाबतचे नियंत्रण

५. संबंधित मुख्य अभियंता हे कार्यालय जबाबदार सल्लागार म्हणून काम पाहते.

६. कामाचा दर्जा व प्रगती याबाबतचे सूक्ष्म निरीक्षण करुन आवश्यक तिथे तांत्रिक मार्गदर्शन करणे.

२. राज्यातील विद्युत विभागाची संरचना खालीलप्रमाणे आहे.

१. अधीक्षक अभियंता (विद्युत), मुंबई प्रादेशिक विद्युत मंडळ

२. अधीक्षक अभियंता (विद्युत), पुणे प्रादेशिक विद्युत मंडळ

३. अधीक्षक अभियंता (विद्युत), नांदेड प्रादेशिक विद्युत मंडळ

४. अधिक्षक अभियंता (विद्युत), नागपूर प्रादेशिक विद्युत मंडळ

५. अधिक्षक अभियंता (विद्युत), दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर.

मंडळ स्तरावरील अधीक्षक अभियंता मुंबई, पुणे, नांदेड , नागपूर व छत्रपती संभाजीनगर हे संबंधित मंडळाचे प्रशासकीय अधिकारी म्हणून काम पाहतात तसेच विभागीय स्तरावरील शासनाचे बांधकामावर प्रशासकीय व व्यावसायिक नियंत्रण ठेवणे ही कामे पाहिली जातात.

३. मुंबई मंडळांतर्गत दक्षिण मुंबई, मध्य मुंबई, उत्तर मुंबई, प्रकल्प (कृषी बांधकाम-५), ठाणे, रायगड, नाशिक व धुळे हे विभाग कार्यान्वित असून पुणे मंडळांतर्गत पुणे, कोल्हापूर व सोलापूर हे विभाग कार्यान्वित आहेत. नांदेड मंडळांतर्गत छत्रपती संभाजीनगर, धाराशीव हे विभाग कार्यरत असून नागपूर मंडळांतर्गत नागपूर, चंद्रपूर, अमरावती व यवतमाळ हे विभाग कार्यरत आहेत. अधीक्षक अभियंता (विद्युत), दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर मंडळाचे अंतर्गत कार्यकारी अभियंता (१) व कार्यकारी अभियंता (२) कार्यरत आहेत.

४. राज्यस्तरावरील विविध विद्युत यंत्रणा तथा अंतर्गत व बाह्य स्वरूपाची विद्युत संचमांडणीची मानकाप्रमाणे तांत्रिक तपासणी करणे, निविदा विषयक कार्यवाही करणे व प्रशासकीय दस्तऐवज, तथा प्रशासकीय बाबी, अभिलेखे हाताळणे इ. बाबी विभागीय स्तरावर केली जातात.

9. ELECTRICAL INSTALLATION IN GOVERNMENT BUILDINGS

1. All types of electrical installations works and related establishment matters in Government Buildings of State Government of Maharashtra are carried out by the five regional electrical offices which are under the control of the Chief Engineer Civil concerned. This office controls and limits the expenditure of available funds as per norms as stated below as per the powers delegated to it.

1. Administrative Approval/Revised Administrative Approval.
2 Sanctioning of over expenditure on works as per completion reports.
3 Acceptance of Tender
4 Controlling of Accounts
5 The concerned Chief Engineer also work as responsible electrical consultant to Government of Maharashtra.
6. Maintaining quality and progress of work by doing regular inspections and accordingly issuing technical guidance.

2. The structure of the electrical department in the state is as follows:-

1. Superintending Engineer, (Electrical), Mumbai Regional Electrical circle
2. Superintending Engineer, (Electrical), Pune Regional Electrical circle
3. Superintending Engineer, (Electrical), Nanded Regional Electrical circle
4. Superintending Engineer, (Electrical), Nagpur Regional Electrical circle
5. Superintending Engineer, (Electrical), Vigilence and quality control circle, Chhatrapati Sambhajinagar

Regional level offices are controlled by the Superintending Engineer having administrative offices at Mumbai, Pune, Nanded, Nagpur and Chhatrapati Sambhajinagar thereby controlling administration at Regional level and exercising professional or commercial control over all the divisional office staff and government installation works.

3. Under the Superintending Engineer Mumbai South Mumbai, Central Mumbai, North Mumbai, Project (Agricultural Construction-5) Thane, Raigad, Nashik & Dhule And Under the Superintending Engineer Pune, Kolhapur & Solapur are functioning. Under the Superintending Engineer Nanded, Nanded,

५. उप विभागीय स्तरावर विद्युतकरणाची कामे भारतीय मानके तथा प्रमाणकांनुसार पार पाडणे, कामांना भेटी देणे, मोजमापे घेणे, कामाचा दर्जा राखणे, कामाच्या तपासण्या करणे इत्यादी कामे पार पाडली जातात.

६. कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (विद्युत) यांना संबंधीत उपभोक्त्याकडून मागणी पत्र प्राप्त झाल्यानंतर त्या कार्यस्थळांना भेट देवून विद्युत व्यवस्थेची अंदाजपत्रके तयार करणे, तांत्रिक मंजुरी, निविदा विषयक कामे, कामांची गुणवत्ता राखणे, विद्युत स्थळावर विविध चाचण्या घेणे, मोजमापे नोंदविणे तसेच तांत्रिक सहाय्यक म्हणून काम करणे अशी कामे केली जातात.

Aurangabad & Osmanabad And Under the Superinteding Engineer Nagpur, Nagpur, Chandrapur, Amravati & Yavtmal divisions are functioning.

4. The Divisional Level office maintains and looks after the various types of electrical works *ie* external and internal installation of buildings including plants and machinery works by carrying out regular technical inspection as per standards, following fo tender procedure governed by State Government's PWD Department and keeping a record of administrative documents at the division level.

5. The Sub divisional offices looks after the electrical installation of govenment buildings as per standards and norms, inspection of electrical works, measuring of works in measurement books, maintaining quality of works, etc.

6. Junior Engineer/Sectional Engineer/Assistant Engineer-II looks after call letters received from user department, visits the site and after proper inspection prepares electrical installation estimates, submits for technical sanction, performs tender procedure and accordingly gets the electrical work done by maintaining quality and after various tests of electrical installation at site record the work in the measurement book. The same wing work as a Technical Assistant to corresponding higher leval officers.

१०. यंत्रसामुग्री व साधन सामुग्री सन २०२५-२६

१) सध्या रस्ते, पूल व इमारतीची कामे पार पाडण्यासाठी खरेदी मुल्यानुसार (अ) निरीक्षण वाहनांची किंमत रुपये ५५.२९ कोटी इतकी असून (ब) बांधकाम यंत्रसामग्रीची किंमत रुपये १५.४९ कोटी इतकी आहे. त्यानुसार एकुण रुपये ७०.७९ कोटी इतक्या किमतीची यंत्रसामग्री व साधनसामग्री या विभागाकडे उपलब्ध आहे.

२) यंत्रसामुग्रीची दुरुस्ती व देखभाल इत्यादी कामाकरिता आवश्यक मार्गदर्शन अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) कार्यालयाकडून करण्यात येते. त्यामुळे उपलब्ध असलेल्या यंत्र सामुग्रीचे निरीक्षण करणे, यांत्रिकी कर्मचाऱ्यांना यंत्रसामुग्रीचा नादुरुस्तीचा कालावधी कमी होण्याच्या दृष्टिने व उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टिने मार्गदर्शन करणे, क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना नियोजन, संग्रह व सुटे भाग खरेदी करण्याच्या बाबतीत सल्ला देणे, यंत्रसामुग्रीचा योग्य उपयोग होणेसाठी बांधकाम अभियंत्याच्या मदतीने कार्यक्रम आखणे तसेच जुन्या यंत्रसामुग्रीचे निर्लेखन करण्यासाठी योग्य सल्ला देणे इत्यादी. कामाचासमावेश होतो.

३) सध्या अस्तित्वात असलेल्या रचनेनुसार या विभागात ३ कार्यकारी अभियंते (यांत्रिकी) आणि २२ उप अभियंते व १२१ शाखा अभियंता (यांत्रिकी) इतकी पदे मंजुर असून ते संबंधित प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंत्याच्या प्रशासकिय अधिपत्याखाली काम करतात. त्यांना तांत्रिक बाबतीत अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांचे मार्गदर्शन मिळते. अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) हे मुख्य अभियंता व सहसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असून त्यांचे मार्गदर्शनाखाली तांत्रिक कामे करण्यात येतात. सद्यस्थितीत १ अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), ३ कार्यकारी अभियंता (यांत्रिकी), १२ उप अभियंता (यांत्रिकी) व ३६ शाखा अभियंता (यांत्रिकी) कार्यरत आहेत.

४) जिल्हा परिषदा अस्तित्वात आल्यानंतर सा. बां. विभागाकडील काही यंत्रसामुग्री, त्यांचेकडे वर्ग करण्यात आलेल्या कामांच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली. सदरील यंत्रसामग्रीमधील (अ) निरीक्षण वाहनांची खरेदी मूल्यानुसार किंमत रुपये १.११ कोटी इतकी असून, बांधकाम यंत्रसामग्रीची खरेदी मूल्यानुसारची किंमत रुपये २.८८ कोटी इतकी आहे. सर्व यंत्रसामग्रीची एकूण किंमत ३.९९ कोटी इतकी आहे. या यंत्रसामुग्रीचा वापर, दुरुस्ती व देखभालीसाठी, जिल्हा परिषदांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दरवर्षी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. सार्वजनिक बांधकाम विभागामधील यांत्रिकी अभियंत्यांकडून वेळोवेळी जिल्हा परिषद अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या यंत्रसामुग्रीच्या दुरुस्ती, देखभालीकरिता व निर्लेखनाबाबत आवश्यक सहकार्य केले जाते.

10. MACHINERY AND EQUIPMENT 2025-26

1. At present Department is having in its possession (A) Inspection Vehicles worth Rs. 55.29 Crores (B) Construction Machinery worth Rs. 15.49 Crores, Total Machinery and Equipments worth about Rs.70.79 Crores as per Purchase cost is available for executing and maintaining road, bridge and building works.

2. Office of the Superintending Engineer (Mech.) is imparting necessary guidance regarding maintenance and repairs of the machinery by mean of inspecting the existing machinery and guiding mechanical staff so as to reduce the under repair period and improve utilization of the machinery and also to advice the field staff about proper use of machinery, planning, stocking and purchase of machinery, write-off of machinery, preparation of programme for better utilization of the machinery with the help of Civil Engineers etc.

3. In the present setup there are 3 Executive Engineers (Mechanical), 22 Deputy Engineers (Mechanical) and 121 Section Engineers who are working under the Administrative control of the concerned Regional Chief Engineers. They are, however, guided on technical matters by the Superintending Engineer (Mechanical). The Superintending Engineer (Mechanical) is under the Administrative Control of Chief Engineer and Joint Secretary to Government, Public Works Department, Mantralaya, Mumbai. and technical works are being executed under his guidance. At Present 1 Superitenden, Engineer (Mech.), 3 Executive Eng. (Mech.), 12 Assistant Eng.(Mech.) and 36 Sectionet Eng.(Mech.) are working.

4.On formation of the Zilla Parishads, some of the machinery of the Department was transferred to the Zilla Parishads. Out of this machinery, cost of (A) Inspection Vehicles as per purchase cost is worth Rs. 1.11 Crores (B) Construction machinery as per purchase cost is worth Rs. 2.88 Crores. Total cost of Machinery and Equipment is worth Rs. 3.99 Crores for their use in connection with the works transferred to them. For the upkeep and maintenance of the machinery, the Department provides every year necessary grants to the Zilla Parishads. Technical guidance is being given by Mechanical Engineers of Public Works Department to Zilla Parishad field officers in connection with operation, maintenance and repairs to machinery with Zilla Parishads.

अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) / सहाय्यक मुख्य अभियंता (यांत्रिकी) / उप अभियंता (यांत्रिकी) / कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (यांत्रिकी) यांची मंजूर, कार्यरत व रिक्त पदांची माहिती खालील तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

अ. क्र.	पदांचा तपशील	एकूण मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	शेरा
१	अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण भवन, नवी मुंबई	१	१	०	ही सर्व पदे जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अंतर्गत येत असून, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत.
२	सहाय्यक मुख्य अभियंता (यांत्रिकी), सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मुंबई/ औरंगाबाद / नागपूर	३	३	०	
३	उप अभियंता (यांत्रिकी)	२२	१२	१०	
४	कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (यांत्रिकी)	१२१	३६	८५	
	एकूण पदे	**१४७**	**५२**	**९५**	

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध असणारी यंत्रसामुग्री व तीची खरेदी मुल्यानुसार असणारी किंमत याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

The following table shows the machineries at present available with the Public Works Department and its purchase cost.

अ. क्र.	यंत्रसामुग्रीचे वर्णन	संख्या	किंमत (रुपये लाखात)	Description of m/c in English
	अ) निरीक्षण वाहने			
१	कार	२४६	१९८८.५८	Car
२	जीप	५०६	३५४१.०३	Jeep
	एकूण	**७५२**	**रु. ५५२९.६१ लाख** **रु. ५५.२९ कोटी**	
	ब) बांधकाम यंत्रसामग्री			
१	मोबाईल व्हॅन	१	७२.३०	Mobile Van
२	रस्तारुळ	०	०	D.R.R.
३	मालगाडी	०	०	Truck
४	टिप्पर			Tipper
५	जलवाहिनी	११०	१४५०.४६	Water Tanker
६	फिरते पूल तपासणी यंत्र	०	०	Mobile Bridge Insp. Unit.
७	ट्रॅक्टर	०	०	Tractor
८	डोझर / जेसीबी	१	२६.९	Dozer/JCB
	एकूण	**११२**	**रु. १५४९.६६ लाख** **रु. १५.४९६६ कोटी**	
	एकूण (अ+ब)	**८६४**	**रु. ७०७९ लाख** **रु. ७०.७९ कोटी**	

जिल्हा परिषदांकडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हस्तांतरित केलेल्या यंत्रसामुग्रीपैकी जिल्हा परिषदांकडे सध्या उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्री व त्यांची खरेदी मूल्यानुसार असणारी किंमत याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

The following Table shows the machineries at present available with the Zilla Parishads transferred by P.W. Department and its Purchase cost.

अ. क्र.	यंत्रसामुग्रीचे वर्णन	संख्या	किंमत (रुपये लाखात)	Description of m/c in English
	अ) निरिक्षण वाहने			
१	अंम्बेसेडर कार	०	०	Ambassador Car
२	जीप	०	०	Jeep
	एकूण	०	० लाख ० कोटी	
	ब) बांधकाम यंत्रसामग्री			
१	रस्तारुळ	०	०	D.R.R.
२	मालगाडी	०	०	Truck
३	जलवाहिनी	१०८	१६२०	Water Tanker
	एकूण	४१	रु १६२० लाख रु. १६.२० कोटी	
	एकूण (अ+ब)	७८	रु. ६७६४ लाख रु. ६७.६४ कोटी	

११. मुंबई शहरातील मुंबई विकास विभाग चाळींचे व्यवस्थापन

१. कमी उत्पन्न असलेल्या गटासाठी व औद्योगिक कामगारासाठी वरळी, डिलाई रोड, नायगांव व शिवडी या ठिकाणी मुंबई विकास विभाग चाळी योजनेखाली १९२१ ते १९२५ च्या काळात २०७ चाळी बांधल्या, ह्या जागा भाड्याने दिल्या जातात, त्यांच्यापैकी काही खोल्या सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना विनामूल्य व काही स्थानिक संस्थांना भाड्याने दिल्या जातात.

२. मुंबई विकास विभागाच्या एकूण २०० इमारती असून त्यांचे एकूण बांधकाम क्षेत्र ४,०५,५२८ चौ. मी. आहे व मूळ भांडवली किंमत रु. २५४.३५ आहे. इमारतीची निगा व किरकोळ तसेच विशेष दुरुस्तीसाठी खालीलप्रमाणे अनुदान खर्च झाला आहे.

(रु.लक्ष)

(१)	२०२२-२०२३	अनुदान	३७४१.०६
		खर्च	३७४१.०६
(२)	२०२३- २०२४	अनुदान	४४९०.७८
		खर्च	४४९०.७८
(३)	२०२४-२०२५	अनुदान	२९६८.००
		खर्च	२९६८.००

३. मुंबई विकास विभाग चाळीचे प्रशासकीय नियंत्रण गृहनिर्माण विभागाद्वारे करण्यात येते. ह्या चाळीचे व्यवस्थापन "मुंबई विकास विभाग चाळी संघटना या एका वेगळ्या यंत्रणेकडे दिले असून संचालक हा तिचा मुख्य असतो. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग हे चाळीच्या प्रशासनासाठी संचालक, विकास विभाग चाळी म्हणून काम पाहतात त्यांना व्यवस्थापक व इतर कर्मचारीवर्ग सहाय्य करतात. या संचालनालयाचे पुढील ३ विभाग असून त्यांची कामे पुढीलप्रमाणे आहेत.

महसूल : या विभागाकडून व्यवस्थापकाच्या नियंत्रणाखाली भाडेवसुली, भाडेकरूचे नियमन करणे, अनधिकृत वापर व बदलास प्रतिबंध करणे ही कामे हाताळली जातात.

अभियांत्रिकी : ह्या चाळीच्या सर्व नागरी अभियांत्रिकी कामाचे परिक्षण करण्याचे काम या विभागाकडून केले जाते ह्यात दुरुस्ती कामे, सफाई, अतिरिक्त फेरफार व लहान मोठी कामे यांचा समावेश आहे हा विभाग संचालकांच्या थेट पर्यवेक्षणाखाली नियंत्रणाखाली कामे करतो.

नियंत्रण : या विभागाकडून संचालनालयाच्या प्रशासनासंबंधी शासनाची व इतरांशी पत्रव्यवहार, कार्यालयाच्या कामावर नियंत्रण, अर्थसंकल्प, भाडेवसुली दक्षता ही कामे हाताळली जातात.

11. MANAGEMENT OF B.D.D. CHAWLS IN MUMBAI CITY

In early twenties under the then Mumbai Development Scheme in all 207 chawls comprising 16,243 single room residential tenants and 302 shops were constructed at Worli, Delile Road, Naigaon, Sewri mainly for the benefit of industrial workers and people from the Low-income group. These tenants are given on rental basis. Some of the rooms are given to Class-IV State Government employees too on rent-free basis and some are given to local institutions rental/leave basis.

2. There are 207 building in B.D.D. Chawls, total built-up area of which mn 4,05,528 sq.mt and total capital cost is Rs. 254.35 lakhs. Grants allotted and expenditure incurred for maintenance and special repairs and current repairs to building is as follows:-

Year	Grants (Rs. in lakhs)	Expenditure (Rs. in lakhs)
2022-2023	3741.06	3741.6
2023-2024	4490.78	4490.78
2024-2025	2968.00	2968.00

The Administrative Department for B.D.D. Chawls is Housing Department

The management of the chawls has been entrusted to a separate organization knows as "Directorate of D D Chawl which is headed by a Director. The Executive Engineer, Central Mumbai Division, Mumbai also acts as the Director, B. D. D. Chawls for administration of these chawls. He is assisted by the Manager (Deputy Engineer), Assistance Manager and the Supporting staff. The Directorate has been divided into three sections as follows -

Revenue Section : This Section works under the Manager and deals with matters such as recovery of rent, regulating tenancies and preventing unauthorized use and changes.

Engineering Section : This Section works under the Manager and is directly under the control of the Director. It looks after the maintenance and repairs of the Civil Engineering works of the Chawls, including minor original works.

Control Section : This Section deals with the administration of the Directorate. Vigilance over recoveries of rent, budget, control over working of the office and correspondence with Government and other parties.

१२. उपवने व उद्याने

१. संचालक, उपवने व उद्याने यांचेकडे उपवने, सार्वजनिक बागा व उद्याने, महत्त्वाच्या शासकीय इमारतीचा परिसर (निवासस्थानांचा व शासकीय कार्यालयांचा) तसेच शासकीय रुग्णालये व शासकीय, शैक्षणिक संस्था, शासकीय रोपमळे वगैरेचे परिरक्षण व गुणनवाढ करण्याचे काम सोपविले आहे. उपवने उद्याने ह्या कार्यालयाचे काम संचालक, उपवने व उद्याने यांच्या अधिकाराखाली असून मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे. ह्या संघटनेची दुसरी महत्त्वाची कामे पुढीलप्रमाणे आहेत :

१) नवीन उद्याने विकसित करण्यासाठी जागांचे सर्वेक्षण, संकल्पचित्र व अंदाजपत्रक तयार करणे व नवीन बागा तयार झाल्यावर त्यांचे परिरक्षण करणे.

२) शोभिवंत रोपे, कंदमुळे, फुलांची रोपे, कुंडीतील रोपे, निवडुंग झाडे, सुटी फुले, झाडांची रोपे, दुर्मिळ झाडे यांची वाढ करून वाजवी दराने वरील गोष्टी उपलब्ध करून देणे.

३) शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था व लोकांना वृक्षारोपण करण्याकरिता प्रवृत्त करण्यासाठी वनमहोत्सवात मोठ्या व सावली देणाऱ्या झाडांची रोपे देणे, तसेच वनमहोत्सव काळात शासकीय उद्यानातून झाडे लावणे, त्याशिवाय इतर विभागांना झाडे लावण्याविषयीचे तंत्र समजावून देणे.

४) नगरपालिका, शासकीय कार्यालये, खाजगी संस्था व सामान्य जनता यांना बगीच्याविषयी सल्ला देणे, वैशिष्ट्यपूर्ण सजावटीसाठी लागणारी फुले व रोपे यांच्या प्रसारार्थ पुष्प प्रदर्शने भरविणे व राज्यातील निरनिराळ्या शहरात भरलेल्या पुष्प प्रदर्शनातून भाग घेणे.

राज्य शासनाने आयोजित केलेल्या महत्त्वाच्या समारंभाच्या वेळी, स्वातंत्र्य दिनी, महाराष्ट्र दिनी, प्रजासत्ताक दिनी तसेच समिती सभागृह मंत्रालय मुख्यमंत्री व इतर मंत्री यांच्या निवासस्थानी फुलांची व फुलझाडांच्या कुंड्यांची सजावट करणे.

२. उपवने व उद्याने ही संघटना दोन सार्वजनिक उपवने, ६, सार्वजनिक उद्याने, ३७ शासकीय कार्यालयास लागून असलेल्या बागा, ३ रुग्णालयांच्या व शैक्षणिक संस्थांच्या बागा, ७८ मंत्रिमहोदयांच्या, न्यायमूर्तींच्या निवासी बंगल्याजवळील बागांचे परिक्षण करते. तसेच फुले, रोपे यांचे लोकांना वाजवी किमतीत विक्री करण्यासाठी व बागेबद्दल आस्था निर्माण करण्यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे एकुण पाच लहान रोपमळे स्थापित केले आहेत. पुणे फोरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी मुंबई येथील बगीचा यांची देखभाल या संघटनेकडून केली जाते.

12. PARKS AND GARDENS

1. The works of development and maintenance of Public Parks and Gardens, Gardens around important Government Buildings, both Residential and Non-Residential, gardens attached to Government Hospitals and Educational Institutions Government Nurseries etc. have been entrusted to the Parks and Gardens Organization. which is headed by the Director Parks and Gardens with head quarters at Mumbai. The other important functions of this organization are :

1. To survey, design and estimate new garden works and maintain them after the Completion of work.

2. To maintain, established Nurseries for collection and multiplication of Ornamental plants, bulbous plants, flowering plants, potted plants, Cactus Succulants. loose flowers, tree saplings, rare plants species

for maintenance and development of garden; as well as to sell them to public at reasonable rates.

3. To supply to public. Government Offices, educational institutions etc. tree saplings free of charge during Vana-Mahotsav.

4. To render advice to the public, Government offices, Government houses, Private bodies. Municipalities on the subject of gardening. To conduct flower-shows for display of quality out flowers, ornamental plants, rare plants species and also to participate in flower-shows conducted in the different cities of the State.

5. To arrange floral decorations for important State functions, on Independence Day and Republic Day and also for important Government meetings conducted at the Mantralaya-Conference Hall and the Residences of the Chief Minister and other Ministers.

2. In all 2 Public Parks, 6 Public Gardens, 37 Gardens attached to important Government Offices 3. Hospital Building Gardens and Educational Institutions, 78 Minister's Residential Bungalow Gardens are maintained by this Organization. In addition to this, one large Nursery is maintained for collection multiplication of plants at Mumbai, near Mantralaya. Also nurseries at Pune. Aurangabad and Nagpur are developed for the purpose of multiplication and sale of plants to the public at reasonable rates so as to encourage among public garden activities. The gardens at Forensic Science Laboratory at Mumbai are being looked after by this Organization, Maintenance is also done by this Organization.

१३. किनारी अभियंता

महाराष्ट्राला ७२० कि. मि. लांबीची किनारपट्टी लाभलेली आहे. त्यावर अनेक छोटी बंदरे विखुरलेली आहेत. ४४ खाड्या व नद्या यांनी हा किनारा तयार झालेला आहे. या किनारपट्टीच्या आधारे जलवाहतुकीद्वारे कोकणची वाहतुकीची गरज भागते.

२. शासन निर्णयानुसार ऑक्टोबर १९९० पासून किनारी अभियंता, मुंबई या संघटनेचे प्रशासकीय नियंत्रण गृह विभागाकडून सा. बां. विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत किनारी अभियंता कार्यालय, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे.

३. बंदर विकासाच्या स्थापत्य अभियांत्रिकी कामाबाबत तांत्रिक मंजुरी निविदा स्वीकारणे इत्यादीकरिता सा. बां. विभागातील अधिक्षक अभियंता यांना असलेल्या अधिकाराप्रमाणेच किनारी अभियंता यांना अधिकार देण्यात आले आहेत. किनारी अभियंता यांच्या कामात खालील तीन विभागीय अधिकारी मदत करतात.

(i) पतन अभियंता, पतन अभियांत्रिकी विभाग (उत्तर), कोकण भवन, नवी मुंबई.

(ii) पतन अभियंता, रत्नागिरी पतन विभाग, रत्नागिरी.

(iii) पतन अभियंता, सिंधुदुर्ग पतन विभाग, ओरोस.

४. किनारी अभियंता यांचे कार्यालयामार्फत खालील कामे करण्यात येतात.

(अ) बंदरालगतच्या सुविधा (जिल्हास्तरीय योजना) : यामध्ये बंदरात चढण्या-उतरण्याकरिता धक्क्यांच्या जेट्टींची बांधकामे तसेच तत्संबंधीची दुरुस्ती इत्यादी कामांचा समावेश होतो.

(ब) प्रवाशांसाठी सुख-सोयी व इतर स्थापत्य अभियांत्रिकी कामे (जिल्हास्तरीय योजना) : यामध्ये प्रवाशांसाठी लागणाऱ्या विविध सुविधांकरिता (उदा. प्रवासी निवारे, पाणीपुरवठा, धक्के, वीजबत्ती वगैरे) करावयाची बांधकामे व तत्संबंधीची दुरुस्ती इत्यादी कामाचा समावेश होतो.

(क) धूप प्रतिबंधक कामे (जिल्हास्तरीय योजना) : यामध्ये किनाऱ्यावर नैर्ऋत्य मान्सून वाऱ्यापासून उद्भवणाऱ्या प्रचंड लाटांचा आघात तसेच खाड्यांच्या मुखावरील रेतीचे पट्टे निर्माण होणे, वादळे व भोवरे या कारणांमुळे समुद्र किनाऱ्यावर जमिनीची जी धूप होते, ती धूप थांबवण्यासाठी करावयाची मूळ कामे व तत्संबंधीची दुरुस्ती इत्यादी कामे हाती घेण्यात येतात.

महाराष्ट्र शासन गृहविभाग यांचे शासन निर्णय क्र. पीएलएन १२०९/ प्र.क्र. २४९/बंदरे २ दि २६-१०-२०१० अन्वये धूप प्रतिबंधक कामे (जिल्हास्तरीय योजना) दि. १-४-२०११ पासून महाराष्ट्र मेरीटाइम

13. COASTAL ENGINEER

Maharashtra is best owed with a coast line of 720 kms, Dotted with 48 Minor Ports and 44 Creeks and Rivers. This water front has been serving partly the transport requirement of the Konkan.

(2) The Coastal Engineering Organization has been separated from Home Department and brought under Administrative Control of Public Works Department Since October 1990 as per Government orders. Coastal Engineer office is working under chief Engineer, public works regional division, Konkan.

(3) The Coastal Engineer enjoys powers of Superintending Engineer in Public Works Department in respect of Technical sanction and acceptance of tender etc. For Civil Engineering Works evolved development of ports. The Coastal Engineer is assisted by 3 Divisional Officers designated as.

(i) Harbour Engineer, Horbour Engineering Division (North) Konkan Bhavan, New Bombay (ii) Harbour Engineer, Ratnagiri Harbour Division. Ratnagiri. (iii) Harbour Engineer, Sindhudurg. Harbour Division, Oros.

(4) The various works carried out are described hereunder -

a. Alongside facilities (District Plan Scheme) - Construction of landing and bearing facilities like wharfs Jetties. Reclamation etc.

b. Passenger Amenities and Other Civil Engineering Works (District Plan Schemes) - This facilities provided for passengers such as construction of buildings like passenger waiting shed arrangement, Electrical Installations approach roads etc.

c. Erosion Prevention Works (District Level Plan) - This involves basic measures to halt erosion and repair damage caused by the impact of large waves during the southwest monsoon season. These measures address the formation of sandbars at bay mouths, storms, and eddies

Anti erosion bunds are constructed as per principles fixed and the allocation of funds made by the concerned District Planning and Development Councils.

बोर्डमार्फत करणेत येत आहेत. मात्र महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे शासन निर्णय क्र. एमआयएस २०१५/प्र.क्र.६४/बंदरे-२ दि २१/५/२०१५ अन्वये धूप प्रतिबंधक कामे पुन:श्च सा. बां. विभागाकडे वर्ग करण्यात आले आहेत.

(ड) लहान मासेमारी बंदरे (केंद्र व राज्य पुरस्कृत योजना) : या योजनेंतर्गत मासे उतरविण्यासाठी मच्छीमार बंदर बांधण्यात येते. सदर मच्छीमार बंदर बांधण्यापूर्वी त्या ठिकाणचे सर्वेक्षण करून जागेची उपयुक्तता इतर सुविधांच्या दृष्टीकोनातून विचार करून जागा निश्चित केली जाते.

(इ) मासळी उतरविण्याची केंद्रे व सुविधा : या योजनेखाली धडक कार्यक्रमांतर्गत धक्का, मासळी उतरविण्याचा चौथरा, उघर निवारा, मार्गदर्शक खांब, उतरता धक्का ओटा बांधणे इत्यादी कामे करण्यात येतात.

वरील कामे जिल्हा नियोजन व विकास मंडळाने दिलेल्या अग्रक्रमानुसार हाती घेण्यात येतात.

The work of Anti sea erosion Bund (District Level Project) was to be carried out by Maharashtra Maritime Board vide Maharashtra Government. Home Department Resolution No. PLN 1209/Pra -ra 249/ Bandare-2 dated 26-10-2010.) (Marathi). But now work of Anti sea erosion Bund handed over to Public Works Department by Govt of Maharashtra. Home Department Resolution No. MIS 0215/Pra-ra. 64/ Bandare-2 dated 21-5-2015 (Marathi).

d. Minor Fishing Ports (Central Government Sponsored Scheme) - Under this scheme, a fisherman's port is constructed for landing fish. Before constructing the fishing port, the site is determined by surveying and considering its utility in relation to other facilities.

e. Fishes landing centre and facilities :- Under this scheme, rapid action programs include the construction of wharves, platforms for drying fish, open shelters, guide poles, slanting wharves, and platforms.

१४. आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्प

राज्य शासनाने राज्यातील रस्त्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने बाह्य अर्थसहाय्यातून रस्ते विकासाची कामे हाती घेतली असून या योजनेच्या पहिल्या टप्प्यात रस्ते सुधारणा करण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून ५०० दशलक्ष अमेरिकन डॉलरचे अर्थसहाय्य घेण्यास मा. मंत्रीमंडळाने दि. २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी मंजुरी दिली आहे. यामध्ये आशियाई विकास बँकेचा ७०% (रु.३५०० कोटी) इतका सहभाग असून राज्य शासनाचा ३०% (रु.१५०० कोटी) सहभाग आहे. त्यानुसार प्रकल्पाची एकूण किंमत ७१५ दशलक्ष अमेरिकन डॉलर म्हणजे ५००० कोटी इतकी आहे.

त्यापैकी टप्पा १ (MSRIP $ Maharashtra State Road Improvement Project) मध्ये रु.१७५० कोटी प्रकल्प किमतीची एकूण ४५१.५१ कि.मी. लांबीच्या १३ रस्त्यांची कामे ९ EPC पॅकेजेसद्वारे हाती घेण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत ही सर्व कामे पूर्ण झाली आहेत. सदर अर्थसहाय्याची परतफेड आगामी २० वर्षात करावयाची असून ती ऑक्टोबर २०२५ पासून सुरु होणार आहे.

टप्पा २ (CECIGM $ Connecting Economic Clusters in Inclusive Growth in Maharashtra) मध्ये रु.३९३९ कोटी प्रकल्प किमतीची एकूण ४६८.३२ कि.मी. लांबीच्या १८ रस्त्यांची कामे १७ EPC पॅकेजेसद्वारे हाती घेण्यात आली असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत व पुढील दोन वर्षांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर अर्थसहाय्याची परतफेड आगामी २० वर्षात करावयाची असून ती मे २०२८ पासून सुरु होणार आहे.

टप्पा १ व टप्पा २ ची एकत्रित किंमत रु.५६८९ कोटी आहे.

आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित प्रकल्पामध्ये स्थापत्य कामाच्या पूर्णतेबरोबरच Environment Management Plan (EMP), Environment Monitoring Plan (EMOP) या पर्यावरण विषयक बाबी व Resettlement Plan (RP), Gender Action Plan (GAP) या सामाजिक सुरक्षा संबंधित बाबी अंतर्भूत आहेत. या योजनेमध्ये प्रथमत: राज्य शासनाच्या निधीतून खर्च करण्यात येऊन झालेल्या खर्चाची पूर्वनिश्चित टक्केवारीनुसार प्रतिपूर्ती आशियाई विकास बँकेकडून प्राप्त होते.

टप्पा ३ : मा. मंत्रीमंडळाने दि.०७.०३.२०२१ रोजी आणखी ५०० दशलक्ष अमेरिकन डॉलरचे अर्थसहाय्य आशियाई विकास बँकेकडून घेण्यास मंजुरी दिली आहे. टप्पा ३ मध्ये १५६३ कि.मी. लांबीचे ४४ प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली असून प्रगतीत आहे.

14. Asian Development Bank aided Maharashtra State Road Improvement Project

The State Government has taken up the development of state roads through external funding from Asian Development Bank. The cabinet has given up an approval for obtaining financial assistance of 500 M USD for the road development on 27.02.2019. The share of Asian Development Bank is 70% (Rs. 3500 Crores) and the share of State Government is 30% (Rs. 1500 Crores). Hence, the total cost of the project is 715 M USD i.e. Rs.5000 Crores.

The Phase-I (MSRIP - Maharashtra State Road Improvement Project) consists of total 13 roads with road length of 451.51 Km costing Rs. 1750 Crores. These 13 roads have been undertaken through 9 EPC packages. At present, all these works are at completion stage. The repayment of the said financial assistance is to be done in the next 20 years and it will start from May 2025.

Phase-II (CECIGM - Connecting Economic Clusters for Inclusive Growth in Maharashtra) consists of total 18 roads with road length of 468.32 Km. costing Rs.3939 Crores. These 18 roads have been undertaken through 17 EPC packages. At present, all these works are in progress and will be completed in next 2 years. The repayment of the said financial assistance is to be done in the next 20 years and it will start from October 2028.

The combined cost of Phase-I and Phase-II is Rs. 5689 Crores.

In addition to civil construction work, the Asian Development Bank includes Environment Safeguards such as Environment Management Plan (EMP), Environment Monitoring Plan (EMOP) and Social Safeguards such as Resettlement Plan (RP), Gender Action Plan (GAP). Initially the expenditure is incurred from the State Government funds and reimbursement at predecided percentage is obtained from by Asian Development Bank.

Phase-III : The cabinet has given an approval to take another financial assistance of 500 M USD from Asian Development Bank on 07.03.2021. In this Phase-III, the work of total 44 projects with a length of 1563 km has been undertaken and is in progress.

१५. हायब्रिड ॲन्युईटी योजना

उद्देश -

औद्योगिक क्षेत्रे, तालुक्याची ठिकाणे, पर्यटन केंद्रे व महत्त्वाची स्थळे यांना राष्ट्रीय महामार्गाशी जोडणाऱ्या महत्त्वाच्या रस्त्यांची सुधारणा.

योजनेचे स्वरुप-

- ❖ केंद्र शासनाच्या Hybrid Annuity Model धर्तीवर राज्यातील सार्वजनिक बांधकाम अखत्यारित असणाऱ्या ९०,००० कि.मी. रस्त्यांच्या जाळ्यापैकी १०,००० कि. मी. लांबीच्या रस्त्यांमध्ये सुधारणा करण्याचा संकल्प.
- ❖ मार्च २०१७ पासून योजना कार्यान्वयीत करण्यास मान्यता.
- ❖ निविदा निश्चिती MORTH व NHAI च्या कार्यपध्दतीप्रमाणे.
- ❖ बांधकाम कालावधी : २ वर्षे. एकुण प्रकल्प कालावधी-१० वर्षे.
- ❖ राज्य शासनाचे ६०% योगदान व खाजगी क्षेत्राचा ४०% सहभाग.
- ❖ प्रकल्प किमतीच्या ६०% रक्कम, बांधकाम कालावधीत पाच समान हफ्त्यात.
- ❖ उर्वरित ४० % रक्कम, समभाग व कर्जाद्वारे उद्योजकामार्फत उभारणी.
- ❖ उद्योजकास ही ४०% रक्कम, प्रकल्प पुर्ततेनंतर आरबीआय चे बँक दर + ३% इतक्या दराने व्याजासह तसेच महागाई निर्देशांकासह दर सहा महिन्याच्या हफ्त्याने शासनाकडून १० वर्षांच्या कालावधीत अदा होणार.
- ❖ सवलत कालावधीमध्ये देखभाल दुरुस्तीची जबाबदारी उद्योजकाची असून या खर्चाची देयके महागाई निर्देशांकासह प्राधिकाऱ्यामार्फत अदा होणार.
- ❖ कार्यक्रम संनियंत्रणासाठी मा. मंत्री, सा.बां. व मा.मंत्री वित्त व नियोजन यांची मंत्रीमंडळ उपसमिती गठीत.

टप्पा - १

हायब्रिड ॲन्युईटी योजनेतून एकुण १५० पॅकेजेसच्या प्रकल्पांची रुपये २८९८० कोटी निविदा किमतीचे आणि ८ हजार ६५४ किमी. लांबीचे रस्त्यांच्या मजबूतीकरण व दर्जोन्नती प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. या एकुण १५० पॅकेजेसच्या प्रकल्पांची ७ हजार ७९० किमी लांबीची कामे पूर्ण झाली आहेत. १५० पॅकेजेसपैकी एकुण ३८ पॅकेजेसचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र निर्गमित झाले आहेत. या प्रकल्पांवर आजतागायत रुपये ३०१२१ कोटी रुपये खर्च झाला आहे.

टप्पा - २

हायब्रिड ॲन्युईटी कार्यक्रमाचा दुसरा टप्पा नव्याने स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे. दुसऱ्या टप्प्यात (HAM- PHASE II) एकुण ६ हजार किमी, इतक्या लांबीच्या एकुण ३४५ प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. त्यापैकी सद्यस्थितीमध्ये ६००० किमी लांबीचे १४६ प्रकल्प प्रगतीत आहेत.

15. Hybrid Annuity Model (HAM)

Objectives: Improvement of Important Roads Connecting Industrial Zones, Taluka Places, Tourist Centers, Important Destinations with National Highway Network.

Nature of the Scheme

- ➢ On the basis of HAM of Central Govt, resolved to improve 10,000 Kms. of road length out of 90,000 Kms. of road network under PWD through Hybrid Annuity Program.
- ➢ Implementation from March-2017.
- ➢ Bidding procedure to be adopted as per MORTH and NHAI.
- ➢ Construction Period 2 Yrs., total project period 10 Yrs.
- ➢ Govt. contribution 60% and Private participation 40%
- ➢ 60% of Project Cost to be paid by Govt. in five equal instalments in construction period.
- ➢ 40% of Project Cost to be raised by Entrepreneur in the form of Equity and Debt.
- ➢ 40% of Project Cost to be paid by Govt. in fixed biannual instalments after completion and in operations period of 10 years. Interest on the Balance Cost : Bank Rate + 3%.
- ➢ Obligation of Maintenance in Concession Period : Entrepreneur.
- ➢ A cabinet subcommittee of Hon. Minister, PWD and Hon. Minister Finance and Planning has been formed for Program Management.

HAM : Phase I

- ➢ A total of 150 packages of projects with a tender price of Rs 28980 crores and 8 thousand 654 km. long road strengthening and upgrading projects have been taken up under the Hybrid Annuity Scheme.
- ➢ Total 7 thousand 790 km. long works of these 150 package projects have been completed. And Rs. 30121 crores have been spent till date.

HAM : Phase II

The second phase of Hybrid Annuity program (HAM- PHASE II) is being implemented through the newly established Maharashtra Infrastructure Development Corporation. In the second phase total 345 packages with a length of 6000 km are to be implemented. At present total 146 packages with a length of 6000 km are at in progress.

१६. नाबार्ड (ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी (RIDF)) कर्जसहाय्य योजना

ग्रामीण पायाभूत सुविधा प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्यासाठी सरकारने १९९५-९६ मध्ये RIDF ची स्थापना केली होती. हा निधी नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंट (नाबार्ड) द्वारे दिला जातो. या निधीचे मुख्य उद्दिष्ट राज्य सरकार मार्फत चालू असलेल्या ग्रामीण पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांना कर्ज सहाय्य प्रदान करणे आहे.

नाबार्ड कर्जसहाय्य योजने अंतर्गत मंजूर कामांना नाबार्ड बँकेकडून अल्प व्याज दरात अर्थ सहाय्य मिळते. नाबार्ड RIDF कर्जसहाय्य योजने अंतर्गत मंजूर प्रकल्पाच्या एकूण निधीपैकी नाबार्ड तर्फे ८० % व महाराष्ट्र राज्य शासनामार्फत २०% निधी देण्यात येतो.

महाराष्ट्रात, नाबार्ड (ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी (RIDF)) कर्ज सहाय्य योजने अंतर्गत नाबार्ड-III (वर्ष १९९८) पासून कामे सुरू झाली. नाबार्ड योजना III ते XXV अंतर्गत कामे पूर्ण झाली आहेत आणि NABARD-XXVI ते NABARD-XXIX अंतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत. नाबार्ड- XXX अंतर्गत कामांना मंजुरी देण्यात आली आहे. सुरुवातीपासून आजपर्यंत सुमारे ९५४६ किमी लांबीचे रस्ते आणि ३९६४ मोठे / लहान पूल सा. बां. विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहेत व त्यासाठी अंदाजे रु. ९५४२ कोटी खर्च झाले आहेत.

नाबार्ड (ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी (RIDF)) कर्जसहाय्य योजने अंतर्गत रस्ते व पूलांचे कामे हाती घेण्यासाठीचे निकष.

अ) ग्रामीण भागांतील बाजारपेठ, आरोग्य, शैक्षणिक सुविधांना जोडणाऱ्या रस्त्यांचा विकास/सुधारणा करणे (MDR/ODR/VR) : सदर प्रस्तावित रस्त्यांची लांबी १ किमी. पेक्षा कमी नको.

ब) राज्य रस्ते विकास योजना अंतर्गत रस्त्यांवरील पूल (SH/MDR/ODR/VR)

१. शैक्षणिक, आरोग्य सुविधांना व बाजारपेठांना जोडणारे रस्ते.

२. खेडी जोडण्यासाठी,

३. जुन्या जीर्ण/क्षतीग्रस्त झालेल्या पुलांची पुनर्बांधणी,

क) प्रकल्पासाठी जमीन ताब्यात असणे तसेच सर्व प्रकारच्या पूर्व परवानग्या (वनविभागाची ना हरकत प्रमाणपत्र, GAD) असणे आवश्यक.

ड) कामांची अंदाजित किंमत हि वस्तुस्थितीदर्शक असेल याची खात्री करावी.

इ) रस्ते कामांसाठी बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ५ वर्ष देखभाल दुरुस्तीची तरतूद.

16. NABARD (Rural Infrastructure Development Fund -RIDF)

Concept Note

The RIDF was set up by the Government in 1995-96 for financing rural Infrastructure projects. The Fund is maintained by the **National Bank for Agriculture and Rural Development (NABARD).** The main objective of the Fund is to provide loan assistance to State Governments and State-owned corporations to enable them to complete ongoing rural infrastructure projects.

Projects approved under NABARD loan assistance scheme get financial assistance from NABARD Bank at low interest rates. 80% of the total funds of the projects sanctioned under RIDF scheme are provided by NABARD and 20% by Maharashtra State Government.

In Maharashtra ,works under NABARD (Rural Infrastructure Development Fund (RIDF)) loan assistance scheme started from Nabard- III (year 1998). Works under Nabard Scheme III to XXV are completed and works under NABARD-XXVI to NABARD-XXIX are in progress. Approval for works under NABARD- XXX has been given. From beginning till date Road length of about 9546 Km. and 3964 Major/Minor Bridges amounting to 9542 Crores has been completed by PWD.

- **Criteria for undertaking road and bridge works under NABARD (Rural Infrastructure Development Fund (RIDF)) loan assistance scheme :-**

A) Development / Improvement of Rural Roads (MDR/ODR/VR) for better connectivity to Market, Health , Education facilities-length not less than 1 KM.

B) Bridges on roads under the State Road Development Plans (SH/MDR/ODR/VR).

1. Roads connecting to Educational, Market, Health facilities

3. End Connectivity

4. Reconstruction of old delipidated / damaged bridges,

C) Land in procession and all prior approvals (Forest, GAD etc.) necessary

D) Realistic Project Cost.

F) Provision for 5 years post construction maintenance for road works.

वित्तीय आवश्यकता व स्पष्टीकरण

तक्ता क्र. १ : सर्वेक्षणासह प्रकल्प तयार करणे.

तक्ता क्र. २ : पूल प्रकल्प, इमारती यांचे संरचनात्मक संकल्पचित्र तयार करणे.

तक्ता क्र. ३ : इमारती प्रकल्पांचे वास्तुशास्त्रीय संकल्पचित्राबाबत.

तक्ता क्र. ४ : रस्त्यांचे परिरक्षण व दुरुस्ती.

तक्ता क्र. ५ : इमारतींचे परिरक्षण व दुरुस्ती.

तक्ता क्र. ६ : यंत्रसामुग्री व साधनसामुग्री—वित्तीय आवश्यकता.

तक्ता क्र. ६ अ : यंत्रसामुग्री व साधनसामुग्री—उपलब्ध यंत्रसामुग्री व साधनसामुग्री.

